**अति महत्त्वाचे :**

जा. क्र. मरापप/जीसीसी/प्रशा/२०२०/ 3196
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-१
दिनांक :- 24/११/२०२०

**प्रति,**

**प्राचार्य,**
**सर्व शासनमान्य टंकलेखन व लघुलेखन संस्था,**
**महाराष्ट्र व गोवा राज्य.**

**विषय :- शासनमान्यता प्राप्त वाणिज्य टंकलेखन व लघुलेखन (GCC) आणि संगणक टंकलेखन (GCC-TBC) संस्थांच्या नुतनीकरणाबाबत.**

उपरोक्त विषयान्वये शासकीय वाणिज्य टंकलेखन व लघुलेखन परीक्षा आणि शासकीय संगणक टायपिंग परीक्षा जुलै-२०२० ते डिसेंबर-२०२० या सत्रासाठीची परीक्षा माहे फेब्रुवारी-२०२१ मध्ये घेण्याचे प्रस्तावित आहे.

सदर परीक्षांची ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्याची कार्यवाही माहे डिसेंबर-२०२० मध्ये होणे अपेक्षित आहे. सदर परीक्षेची ऑनलाईन आवेदनपत्र भरत असताना त्यासोबत नुतनीकरण आदेश अपलोड करणे आवश्यक आहे.

त्या अनुषंगाने संदर्भिय पत्रान्वये आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची नुतनीकरणाबाबतची कार्यवाही विभागीय शिक्षण उपसंचालक या कार्यालयाकडे प्रस्ताव दाखल करुन दि.३० नोव्हेंबर २०२० पर्यंत करुन घ्यावी.

सदरील फेब्रुवारी - २०२१ मध्ये होणाऱ्या शासकीय वाणिज्य टंकलेखन व लघुलेखन परीक्षा आणि शासकीय संगणक टायपिंग परीक्षांसाठी ऑनलाईन नुतनीकरण आदेश प्राप्त नसल्यास, अशा संस्थांमधील विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे स्विकारली जाणार नाहीत, याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

**(तुकाराम सुपे)**
**आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद**
**पुणे-१**

**प्रत : विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व) व शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद (सर्व)**
**२/- देऊन कळविण्यात येते की, आपल्या कार्यक्षेत्रातंर्गत येणाऱ्या शासनमान्यता प्राप्त टंकलेखन व लघुलेखन आणि संगणक टंकलेखन संस्थांच्या नुतनीकरणाबाबत शासनाच्या प्रचलित धोरणानुसार व यथानियम कार्यवाही दि.३० नोव्हेंबर २०२० पूर्वी करण्यात यावी.**

DESKTOP/GCC EXAM JAN-20/EXAMTIME LETTER